# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३
E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

**अतितात्काळ**

क्रमांक विकाअ/शिक्षण/तपासणी/२०१५/2547
दिनांक :- 9 OCT 2015

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व विनाअनुदानित व अल्पसंख्यांक (अभियांत्रिकी पदवी) संस्था.
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित व अल्पसंख्यांक संस्थांच्या संस्थास्तरावरील आणि अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेशासाठी गुणवत्ता यादीच्या अनुषंगाने प्रोसेसिंग शुल्क भरण्याबाबत.**

संदर्भ :- १. मा.संचालक,तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २अ//एडीएम/२०१३/१३११ दिनांक ७ जुलै २०१४.
२. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई येथिल दिनांक ३०/९/२०१५ रोजी आयोजित बैठकीतील सुचना.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासुन राज्यातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येणा-या सयुक्त प्रवेश परीक्षेच्या (Joint Entrance Exam) आधारे करण्यात येत आहे. त्यानुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येऊन त्यानुसार गुणवत्तेवर प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. याकरीता संचालनालयाच्या संकेतस्थळावर अनुसरावयाची कार्यपध्दती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने सीबीएसई, आयसीएसई व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ या मंडळाच्या विद्यार्थ्यांचे गुण व त्यांचे पर्सेंटाईल संस्थासाठी त्यांच्या लाग इन मार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. तरी प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम राबविणा-या व विनाअनुदानित अल्पसंख्यांक तसेच अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या संस्थाकडे संस्थास्तरावरील आणि अल्पसंख्यांक कोटयासाठी उमेदवार अर्ज करतात. अशा उमेदवाराची गुणवत्ता यादी शासनाच्या वरील कार्यपध्दतीनुसार करणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या कार्यपध्दतीनुसार संस्थांकडे अर्ज केलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी सर्व संस्थांना त्यांच्या इन्स्टिटुयट कोडने लॉग इन केल्यानंतर पर्सेंटाईल व नॉर्मलायझेशनची माहीती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्या आधारे त्यांना उमेदवारांचे गुण दर्शविता येतील. तसेच सर्व अशासकीय विनाअनुदानित अभियांत्रिकी संस्थेतील संस्थास्तरावर करण्यात येणा-या प्रवेशाकरीता देखिल पर्सेंटाईल बाबतची माहीती संस्थेच्या लॉग इनव्दारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. अशा प्रकारे तयार केलेल्या संस्थास्तरावरील तसेच अल्पसंख्यांक कोटयातील गुणवत्ता यादी तपासणी या कार्यालयाकडुन करण्यात येईल.

# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


प्रवेशासबंधी सर्व प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत असल्याने प्रवेशास अधिनस्त असलेल्या सर्व विनाअनुदानित बिगर अल्पसंख्यांक आणि अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्थांकडुन रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) इतक्या रकमेचा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (मुंबई येथे देय असलेला) यांचे नावे काढलेला धनाकर्ष प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यावर गुणवत्ता यादी पडताळणी वेळी या कार्यालयाकडे प्रोसेसिंग शुल्क म्हणुन सादर करावे. अन्यथा आपल्या संस्थेची गुणवत्ता यादी या कार्यालयाव्दारा प्रमाणित करुन मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.